नि.फौ.ख.क्र७४/२०१६
सरकार वि. विकास
नि.क.२२

**सरकार पक्षा तर्फे साक्षीदार क.२ यांची जबानी**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक कथन करतो/करते की,

माझे नाव : उमेश हनुमंतराव कारमोरे
वय : ५२ वर्षे, व्यवसाय : मजुरी
राहणार : बुधवारीपेठ, उमरेड, तह. उमरेड, जि. नागपूर

**सर तपास सरकारी अभियोक्ता श्री. मरसकोल्हे यांचे मार्फत :-**

मी आरोपीला ओळखतो, तो माझा सख्खा भाउ आहे. घटनेला अंदाजे चार वर्ष झाले. घटना ही रात्री ८:०० ते ८:३० चे दरम्यान माझे घ राजवळ व गिल्लूरकराचे वळण जवळ घडली. त्यावेळी मी गाडी घेवून घराकडे रात्री येत होतो. आरोपी हा वळणा जवळ लपून बसला होता. मी वळणावर पोहोचलो असता आरोपी तेथे आला व त्याने त्याच्या कंबरेजवळ लपून ठेवलेले अवजार काढले व माझेवर वार केले. एक वार माझे उजव्या पायाच्या मांडीवर लागला व दुसरा वार छातीवर डाव्या साईडला लागला. त्यानंतर मी माझी गाडी फेकून दिली व त्याने माझे पोटावर डाव्या साईडला व हातावर एक वार केला. त्यामुळे मी खाली पडलो व त्यानंतर पुन्हा त्याने मला वार मारला, मी माझे बगल मध्ये दाबून धरलो. त्यानंतर माझे पत्नीला माहित होताच ती घटनास्थळावर आली. व त्यानंतर माझी पत्नी पोलीस स्टेशनमध्ये आली. माझी पत्नी पोलीसांना सोबत घटनास्थळावर आणले. त्यावेळी मी आरोपीची चाकूची मूठ पकडून होतो. त्या अवजाराला दोन्हीकडून धार होती. त्यावेळी घटनास्थळाच्या दोन्ही बाजूला लोक उभे होते.

त्यानंतर पोलीसांनी मला आरोपीच्या ताब्यातून सोडविले. आरोपीने पोलीस येण्याअगोदर धमकी दिली की, जो कोणी गवाही दयायला येईल तर त्याला जिवाने मारून टाकीन. त्यानंतर पोलीसांनी मला उमरेड येथील ग्रामीण रूग्णालय येथे आणले. तेथे माझे पोटाला व मांडीला टाके लावले. आरोपीने मला ज्या अवजाराने मारले ते अवजार दाखविल्यास मी ओळखू शकतो. आता मला आरोपीने उपयोगात आणलेला धारदार भाला दाखविण्यात आला. तो तोच आहे. त्याला आर्टीकल 'अ' देण्यात येते.

आता मला मी घटनेच्या दिवशी घातलेले शर्ट, पॅन्ट व बनियान दाखविण्यात आले. ते तेच आहेत. त्यांना आर्टीकल 'ब, क, ड' देण्यात येते.

पोलीसांनी विचारपूस केली होती. पोलीसांनी माझे बयान घेतले होते.

**<u>उलट तपास आरोपीतर्फे वकील श्री.खाटीक यांचेमार्फत :</u>-**

माझी आई मरण पावली आहे. तिचे एलआयसी चे पैसे मिळाले नाही. हे म्हणणे खरे नाही की, एलआयसी चे नॉमीनी आरोपी होता.  हे म्हणणे खरे आहे की, एलआयसीचे पैसे मिळण्याकरिता वाद होता. माझे वडिलांचा आधी पानठेला होता.  हे म्हणणे खरे आहे की, त्यांच्या मृत्यनंतर विकासने पानठेला चालवितो असे म्हटले होते.  हे म्हणणे खरे नाही की, पानठेला चालवितो यासंबंधी माझेत व आरोपीमध्ये वाद होता.  हे म्हणणे खरे आहे की, आरोपी एलआयसीचे पैसे मला एकटयालाच पाहिजे असे म्हणत होता. हे म्हणणे खरे नाही की, एलआयसीच्या पैश्यावर नॉमीनी म्हणून विकास याचे एकटयाचे नाव होते.

हे म्हणणे खरे आहे की, तथाकथित घटनेच्या अगोदरपासूनच माझे व आरोपीचे पटत नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, माझेविरोधात न्यायालयात फौजदारी केस चालू आहे. हे म्हणणे खरे आहे की, ती केस पुराव्याला आहे. हे

म्हणणे खरे आहे की, त्या केसमध्ये आरोपी हा फिर्यादी आहे. हे म्हणणे खरे आहे की, तथाकथित घटनेच्या दिवशी घराजवळ पाण्याचे टाके होते. हे म्हणणे खरे नाही की, त्या टाक्याला झाकण नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, त्या टाक्यातील पाण्याचा वापर आरोपी करीत होता. हे म्हणणे खरे नाही की, त्या टाक्यामध्ये मी कचरा टाकत होतो. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे माझे व आरोपीचे वारंवार वाद होत होते.

माझे उजव्या पायाच्या मांडीला मार लागला व छातीला मार लागला हे मी माझे बयानात सांगितले होते. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटे सांगितले होते. मी आरोपीने मारलेल्या शस्त्राला बगलमध्ये दाबून ठेवले होते हे बयान देतेवेळी सांगितले होते. मी माझे बयानामध्ये सांगितले होते की, माझे पत्नीला घ टनेची माहिती होताच तिने पोलीस स्टेशनला फिर्याद दिली होती. माझी पत्नी पोलीसांना घेवून आली व मी आरोपीने मारलेले शस्त्र तसाच पकडून होतो, हे बयानात सांगितले होते. आरोपीने वापरलेल्या शस्त्राला दोन्ही बाजूने धार होती, हे मी बयानामध्ये सांगितले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, मी त्यासंबंधी न्यायालयात खोटे सांगितले.

घटनेच्या वेळी दोन्ही बाजूला लोक जमले होते, हे मी बयानात सांगितले नव्हते. पोलीसांनी मला आरोपीच्या ताब्यातून सोडविले, हेसुध्दा मी बयान देतेवेळी सांगितले नव्हते. कोणीही आरोपीविरूध्द गवाही देवू नये, अशी धमकी आरोपीने दिल्याची बाब मी पोलीसांना बयान देतेवेळी सांगितली नव्हती. जे कुणी मारेल त्याला जिवाने मारून टाकीन, ही बाब मी बयान देतेवेळी सांगितली नव्हती. मी वरील बाब बयानात का सांगितले नाही कारण मी जख्मी होतो. हे म्हणणे खरे आहे की, मी त्यावेळी बयान दयायला सक्षम नव्हतो. हे म्हणणे खरे नाही की, बयानात काय लिहीले आहे, हे मला माहित नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी सक्षम नसल्याने मला बयानात काय लिहीले आहे, हे मला माहित नव्हते.

हे म्हणणे खरे आहे की, आर्टिकल ब,क,ड हे बाजारात उपलब्ध असू शकतात. हे म्हणणे खरे आहे की, एखादा व्यक्ती पेंटींगचे काम करीत असल्याचे त्याचे डाग त्याच्या कापडाला लागू शकते. हे म्हणणे खरे आहे की, पेंटरचे कपडे फाटू शकते व रंगाचे डाग त्यावर लागू शकते.

घटनास्थळावर वळन आहे, ही बाब मी पोलीसांना सांगितली नव्हती. मी बयानात सांगितले नाही कारण पोलीसांनी मला उचलून नेले त्यामुळे मला सांगण्याची आवश्यकता वाटली नाही. आर्टीकल अ ला ग्रामीण भागामध्ये भाला म्हणतात. हे म्हणणे खरे आहे की, आर्टिकल अ ला रानटी जनावराला मारण्याकरिता उपयोगात आणले जाते. हे म्हणणे खरे आहे की, आर्टिकल अ हे सहजपणे उपलब्ध होवू शकते.

हे म्हणणे खरे आहे की, आरोपी व माझेमध्ये दिवाणी वाद चालू होता. हे म्हणणे खरे नाही की, आज रोजी मी न्यायालयात खोटी साक्ष देत आहे.

**फेर तपास काही नाही.**

वा.दा.ब.अ.क.केले समक्ष

न्या.दं.प्र.श्रे.
उमरेड

(ए.व्ही. पंडित)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, उमरेड
दि : १७.०२.२०२१